# सिंहगडरोड पो.स्टे. प्रेसनोट दि. २६/०७/२०१९

## कम्युनिटी पोलीसींग अनुषंगाने नारायणराव सणस शाळा धायरी या ठिकाणी भेट देवुन विदयार्थ्यांना केले मार्गदर्शन

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात कार्यान्वीत असलेल्या ॲप/योजनांची माहीती देणेसाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस स्टेशन हद्दीतील नारायणराव सणस शाळा धायरी, पुणे या ठिकाणी दि. २४/०७/२०१९ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी.व्ही.पवार यांच्या सुचना व मार्गदर्शनुसार सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे पोलीस उप-निरीक्षक नितीन जाधव व पोलीस हवालदार ४४४९ मोहन टापरे यांनी नारायणराव सणस शाळेला भेट दिली. सदर भेटी दरम्यान उपस्थित ३५० ते ४०० विदयार्थी व विदयार्थीनी यांच्या अडचणी समजुन घेवुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. सदर वेळी पोलीस काका संकल्पना, महिला, मुली यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन अत्याचाराबाबतचे गुन्हे, अंमली पदार्थ, व्यसने, छेडछाडी संदर्भांत, रॅगिंग, वाहतुकीचे नियम व हेल्मेट वापराबाबत माहीती सांगण्यात आली तसेच महिला व मुलींना छेडछाड, रॅगिंग संदर्भांत काही अडचण आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शल, पोलीस काका हे उपलब्ध होतात याबाबत मार्गदर्शन केले.

